# शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम

## राष्ट्रीय सेवा योजना २०२३-२४

## विशेष शिबीर

शासकीय तंत्रनिकेतन,वाशिम मधील राष्ट्रीय सेवा योजना २०२३-२४ अंतर्गत दिनांक १६ व १७ मार्च २०२४ रोजी जांभरून नावजी या दत्तक घेतलेल्या गावामध्ये विशेष शिबीर घेण्यात आले. विशेष शिबिराच्या कार्यक्रमउद्धाटनाप्रसंगी संस्थेचे प्राचार्य डॉ.बी.जी.गवलवाड सर प्रमुख अतिथी सरपंच श्रीमती पूजा ठाकरे, पोलीस पाटील श्री हनुमान मालस व ग्रामसेवक श्री ईडोळे साहेब उपस्थित होते.









गावामध्ये प्रभात फेरी काढताना, श्रमदान करताना व स्वच्छता करतांना रा.से.यो. चे स्वयंसेवक.




















“बाल विवाह मुक्त भारत” या विषयावर इंडियन सोशल सर्विस ऑफ एजुकेशन,नागपूर यांच्या मार्फत मार्गदर्शन करण्यात आले.




“व्यक्तिमत्व विकास” या विषयावर श्री पंकज बंडे सर यांनी मार्गदर्शन केले.




“तरूणाई समोरची आव्हाने” या विषयावर श्री राजेश्वर लव्हाळे सर यांनी मार्गदर्शन केले.

# शासकीय तंत्रनिकेतनच्या वतीने विशेष शिबिराचे आयोजन

लोकशाही वार्ता / वाशीम

राष्ट्रीय सेवा योजना शासकीय तंत्रनिकेतन वाशीममार्फत दत्तक ग्राम जांभरूण नावजी या ठिकाणी दि. १७ व १८ मार्च २०२४ रोजी दोन दिवसीय विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

विशेष शिबिराच्या कार्यक्रम उद्घाटनाप्रसंगी संस्थेचे प्राचार्य डॉ. बी. जी. गायकवाड, प्रमुख अतिथी सरपंच पूजा ठाकरे, पोलिस पाटील हनुमान मालस, ग्रामसेवक इडोळे, एनएसएस समन्वयक श्री नागे, श्री लव्हाळे, श्रीमती जायदे, श्रीमती भंगाळे अधिकारी, कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डॉ. बी. जी. गवलवाड यांनी विद्यार्थी जीवनात अभ्यासासह इतर उपक्रमात सहभाग नोंदविल्यास सर्वांगीण विकास साध्य करता येतो. तसेच समाज व राष्ट्र विकासात



महत्वपूर्ण योगदान द्यावे असे विद्यार्थ्यांना सांगितले.

या शिबिरामध्ये सकाळच्या सत्रात गावामध्ये रॅली व पथनाट्याच्या माध्यमातून मतदार जनजागृती, बालविवाहमुक्त भारत, आरोग्य इत्यादी कार्यक्रमाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. तसेच श्रमदानातून गावातील रस्ते सफाई, नालेसफाई, जि. प. शाळा व मंदिर परिसराची साफसफाई करण्यात आली. शिबिरामध्ये श्रमदानाबरोबर ज्ञानात भर पडावी यासाठी तज्ज्ञ वक्त्यांचे मार्गदर्शन ठेवण्यात आले होते. यामध्ये मोटीव्हेशनल स्पीकर पंकज बांडे यांनी व्यक्तीमत्त्व विकास व राजेश्वर लव्हाळे यांनी तरुणाई समोरची आव्हाने या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

सदर विशेष शिबिर यशस्वी करण्यासाठी संस्थेचे प्राचार्य, एनएसएस समन्वयक अधिकारी कर्मचारी रासेयोचे स्वयंसेवक गावातील सरपंच, पोलिस पाटील, ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.